साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २३ वा | सोमवार, दि. २२/०६/२०२६ ते दि. २८/०६/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## अखेर अग्निशामक विभागाची परवानगी घेऊनच बांधकाम पूर्णत्व दाखले देण्याचे आयुक्तांचे आदेश

धुळे – शहरातील नागरिकांच्या जीवित सुरक्षेशी संबंधित असलेल्या अग्निसुरक्षा नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी आरंभ फाउंडेशनने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून, धुळे महानगरपालिकेचे आयुक्त यांनी अग्निशामक विभागाची आवश्यक परवानगी (Fire NOC) घेतल्याशिवाय कोणत्याही इमारतीस बांधकाम पूर्णत्व दाखला (Completion Certificate) देऊ नये, असे स्पष्ट आदेश जारी केले आहेत. आरंभ फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन जगन्नाथ शेवतकर, राहुल यादनिक, संदीप कोळगीर व राजेंद्र पवार यांनी यासंदर्भात महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदन सादर करून, अग्निशामक विभागाची अनिवार्य परवानगी न घेता अनेक इमारतींना बांधकाम पूर्णत्व दाखले देण्यात येत असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित केला होता. निवेदनात १५ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या तसेच रहिवासी, व्यावसायिक व संस्थात्मक इमारतींसाठी राष्ट्रीय इमारत संहिता (National Building Code) व संबंधित कायद्यांनुसार अग्निशामक विभागाची पूर्व व अंतिम लेखी परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले होते. या नियमांचे उल्लंघन झाल्यास भविष्यात मोठ्या दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले होते. या गंभीर बाबीची दखल घेत आयुक्तांनी यापुढे अग्निशामक विभागाची आवश्यक परवानगी (Fire NOC) घेतल्याशिवाय कोणत्याही इमारतीला पूर्णत्व दाखला देऊ नये, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय मानला जात असून, आरंभ फाउंडेशनच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना आरंभ फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन जगन्नाथ शेवतकर यांनी सांगितले की, हा निर्णय नागरिकांच्या जीवित सुरक्षेला प्राधान्य देणारा असून, भविष्यात अग्निसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी आरंभ फाउंडेशन सातत्याने पाठपुरावा करत राहील.

## धुळे जिल्हा रुग्णालयात 'जागतिक सिकलसेल दिन' उत्साहात साजरा

# सन २०४७ पर्यंत सिकलसेल मुक्त भारताचे उद्दिष्ट

धुळे (जिमाका) – केंद्र शासनामार्फत १ जुलै २०२३ पासून राष्ट्रीय सिकलसेल निमिया निर्मूलन मिशन राबविण्यात येत असून, सन २०४७ पर्यंत देशातून सिकलसेल आजाराचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर १९ जून जागतिक सिकलसेल दिनानिमित्त धुळे जिल्हा रुग्णालयात सिकलसेल तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावर्षी जागतिक सिकलसेल दिनानिमित्त 'सिकलसेल रुग्णांच्या आरोग्यातील विषमता दूर करणे' या संकल्पनेवर आधारित जनजागृती करण्यात आली. महाराष्ट्रातील आदिवासी बहुल २१ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत ० ते ४० वयोगटातील नागरिकांच्या सिकलसेल तपासणीवर विशेष भर देण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे, पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सिकलसेल दिन व पंधरवडा मोहीमेचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांनी सिकलसेल आजाराची लक्षणे, उपचार पद्धती व नियमित तपासणीचे महत्त्व याबाबत माहिती दिली. सिकलसेल हा अनुवांशिक रक्ताचा आजार असून, वेळेवर तपासणी व नियमित उपचारांमुळे रुग्ण सामान्य जीवन जगू शकतात असे सांगितले. भविष्यातील पिढीला या आजारापासून वाचविण्यासाठी विवाहापूर्वी सिकलसेल कुंडली (आरोग्य पत्रिका) जुळविण्याचे आवाहनही त्यांनी केले. तसेच उपस्थित सिकलसेल रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. धुळे जिल्हा रुग्णालयात आयोजित शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांद्वारे नागरिकांची मोफत रक्त तपासणी करण्यात आली. आजाराचे निदान झालेल्या रुग्णांना हायड्रॉक्सीयुरिया व फॉलिक सिड गोळ्यांसह समुपदेशन कार्डचेही वितरण करण्यात आले. या शिबिराचे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे, भाऊ साहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सयाजी भामरे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महेश भडांगे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.अश्विनी भामरे, निवासी वैद्यकीय अधिकारी विवेक जाधव, सहायक अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.स्वप्निल पाटील,वैद्यकीय अधिकारी डॉ. गीतांजली सोनवणे, डॉ. अभय शिनकर, डॉ. हेमंत चौधरी, डॉ. मोहसीन मुल्ला, डॉ. अलीम अन्सारी, डॉ. मनीषा चौधरी, डॉ. दिनेश दहिते, डॉ. म्हसणे,परिचारिका व नर्सिंग स्टाफ तसेच जिल्हा सिकलसेल व कल्याण समिती समन्वयक विलास वारुडे, सिकलसेल समुपदेशक दौलत मोरे आणि आधिपरिचारक कमलेश परदेशी,आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी, वैद्यकीय तज्ज्ञ, परिचारिका, समुपदेशक तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरिकांनी शिबिराचा लाभ घेत सिकलसेल तपासणी करून घेतली.

# धुळे जिल्ह्यात अतिसार नियंत्रण अभियानाचे आयोजन

धुळे (जिमाका) – बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत स्टॉप डायरिया कॅम्पेन २०२६ अंतर्गत धुळे जिल्ह्यात १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत अतिसार नियंत्रण अभियान राबविण्यात येणार आहे. अतिसारावर करा मात, स्वच्छता आणि ओआरएसची घेऊनी साथ हे या अभियानाचे घोषवाक्य असून नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी केले आहे. या अभियानांतर्गत पाच वर्षांखालील बालकांमध्ये अतिसारामुळे होणारे आजार व मृत्यू कमी करण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. अतिसार झालेल्या बालकांना ओआरएस आणि झिंक गोळ्यांचे वितरण, पालकांचे समुपदेशन, हात धुण्याबाबत जनजागृती, स्वच्छतेबाबत मार्गदर्शन तसेच आवश्यकतेनुसार आरोग्य संस्थांमध्ये उपचार सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, अंगणवाडी, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत घरभेटी देऊन पाच वर्षांखालील बालकांच्या कुटुंबांना अतिसार प्रतिबंध व व्यवस्थापनाबाबत माहिती दिली जाईल. तसेच लहान मुलांची आरोग्य तपासणी, अतिसाराची लक्षणे असलेल्या बालकांची ओळख, ओआरएस पावडर व झिंक गोळ्यांचे वितरण, सुरक्षित पाणी वापराबाबत मार्गदर्शन तसेच स्वच्छतेविषयी जनजागृती केली जाणार आहे. तसेच शाळा व अंगणवाडी केंद्रांमध्ये हात धुण्याचे प्रात्यक्षिक, स्वच्छतेचे महत्त्व आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. अतिजोखीम क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करून् सर्व बालकांपर्यंत ओआरएस व झिंक उपचार सेवा पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

पावसाळ्यातील अतिसारापासून बचावासाठी आरोग्य विभाग सज्ज – पावसाळा सुरु होताच दूषित पाणी, अस्वच्छता आणि अन्नातील जंतुसंसर्गामुळे अतिसार, उलट्या, पोटदुखी यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढते. विशेषतः पाच वर्षांखालील बालकांमध्ये अतिसार हा गंभीर ठरू शकतो शरीरातील पाणी आणि क्षार मोठ्या प्रमाणात कमी झाल्यास जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यभर अतिसार नियंत्रण अभियान राबविण्यात येत आहे.

अतिसार म्हणजे काय? – वारंवार पातळ शौच होणे याला अतिसार म्हणतात. दूषित पाणी, खराब अन्न, विषाणू किंवा जंतुसंसर्गामुळे हा आजार होतो. लहान मुलांमध्ये अतिसारामुळे शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते. त्यामुळे अशक्तपणा, डोळे खोल जाणे, तोंड कोरडे पडणे, लघवी कमी होणे अशी लक्षणे दिसू शकतात.

अतिसाराची प्रमुख कारणे – दूषित किंवा उघड्यावरचे पाणी पिणे.अस्वच्छ हाताने अन्न सेवन करणे. शिळे व दूषित अन्न खाणे. परिसरात अस्वच्छता व साचलेले पाणी.माश्यांमुळे होणारे जंतुसंसर्ग.बालकांना अपूर्ण स्वच्छतेत पूरक आहार देणे.

अतिसार टाळण्यासाठी महत्त्वाच्या उपाययोजना – सुरक्षित पाण्याचा वापर, पिण्याचे पाणी उकळून किंवा फिल्टर करूनच वापरावे. पाण्याची भांडी झाकून ठेवावीत. शक्यतो क्लोरीनयुक्त पाण वापरावे. हात धुण्याची सवय, शौचानंतर, अन्न बनवण्यापूर्वी व जेवणापूर्वी साबणाने हात धुणे अत्यंत आवश्यक आहे. स्वच्छ अन्न सेवन ताजे व गरम अन्न खावे. उघड्यावर विकले जाणारे पदार्थ टाळावेत. फळे व भाज्या स्वच्छ धुवून वापराव्यात.

बालकांची विशेष काळजी – सहा महिन्यांपर्यंत केवळ स्तनपान द्यावे. अतिसार झालातरी स्तनपान बंद करू नये.

परिसर स्वच्छ ठेवणे – घराभोवती साचलेले पाणी, घाण व कचरा त्वरित हटवावा. शौचालयाचा वापर करावा.

अतिसार झाल्यास काय करावे ? – अतिसार झाल्यानंतर शरीरातील पाणी आणि क्षारांची कमतरता भरून काढणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी ओआरएस द्रावण उपयोगी ठरते.

ओआरएस कसे तयार करावे? – एक लिटर स्वच्छ पाण्यात ओआरएसचे पूर्ण पाकीट मिसळून द्रावण तयार करावे आणि २४ तासांच्या आत वापरावे.

झिंक गोळ्यांचे महत्त्व – डॉक्टरांच्या सल्ल्याने बालकांना १४ दिवस झिंक गोळ्या दिल्यास अतिसार लवकर नियंत्रणात येण्यास मदत होते आणि पुन्हा होण्याचा धोका कमी होतो.

तात्काळ डॉक्टरांचा सल्ला केव्हा घ्यावा? – वारंवार उलट्या होत असल्यास, बालक सुस्त होत असल्यास, लघवी कमी होत असल्यास, शौचात रक्त दिसल्यास, ताप व अतिसार एकत्र असल्यास, बालक पाणी पिणे बंद करत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

आरोग्य विभागाचे आवाहन – अतिसार हा साधा आजार समजून दुर्लक्ष करू नये. योग्य वेळी ओआरएस, झिंक व वैद्यकीय उपचार घेतल्यास गंभीर परिणाम टाळता येऊ शकतात. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेची सवय अंगीकारून सुरक्षित पाणी वापरावे व आपल्या कुटुंबाच् आरोग्य जपावे. धुळे जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन बालकांच्या आरोग्य संरक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सचिन बोडके यांनी केले आहे. अतिसार झाल्यास त्वरित ओआरएसचे द्रावण देणे, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार झिंक गोळ्यांचा वापर करण आणि गंभीर लक्षणे आढळल्यास जवळच्या आरोग्य संस्थेत संपर्क साधणे आवश्यक असल्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# छत्रपती संभाजी महाराजांना मानाचा मुजरा

**विशेष लेख...**

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळाले. संभाजी महाराजांच्या आई, महाराणी सईबाईंचे निधन महाराज लहान असतानाच झाले. त्यानंतर पुण्याजवळील कापूरहोळ गावची धाराऊ ही स्त्री त्यांची दूध आई बनली. संभाजी महाराजांचा सांभाळ त्यांची आजी राजमाता जिजाबाई यांनी केला. त्यांच्या सावत्र आई, पुतळाबाई१ यांनी देखील त्यांच्यावर खूप माया केली. मात्र त्यांची सावत्र आई सोयराबाई२ यांनी संभाजी महाराजांना पोरकेपणाने वागवले तसेच संभाजी महाराजांच्या राजकीय कारकिर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजी महाराज अत्यंत देखणे आणि शूर होते. तसेच ते अनेक भाषांत विद्याविशारद व अत्यंत धुरंदर राजकारणी होते. राजकारणातील बारकावे त्यांनी भराभर आत्मसात केले होते. मुघल दरबारातील घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले तर त्याचा त्यांना भविष्यात उपयोग होईल या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे ९ वर्षांचे होते. शिवाजी महाराज कैदेतून निसटल्यानंतर स्वराज्यापर्यंतची धावपळ संभाजी राजांनी सोसू नये आणि त्यामुळे त्यांना काही काळ सुरक्षित ठिकाणी ठेवणे गरजेचे होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी त्यांना मोरोपंत पेशव्यांच्या मेहुण्याच्या घरी मथुरेला ठेवले. मुघल सैनिकांचा संभाजी राजांच्या मागचा ससेमिरा थांबवण्याच्या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा पसरवून दिली. ते महाराष्ट्रात पोहोचल्यानंतर काही काळाने संभाजी महाराज सुखरूपपणे स्वराज्यात येऊन पोहोचले.

इ.स. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तोपर्यंत संभाजीराजे राजकारणातील लहान बारकावे आणि रणांगणातील डावपेचांमध्ये तरबेज झाले होते. त्यांच्या विनम्र स्वभावाने राज्याभिषेकासाठी रायगडावर आलेल्या प्रतिनिधींना त्यांनी आपलेसे केले. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर १२ दिवसात जिजाऊंचे निधन झाले. त्यानंतर संभाजीराजांकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.

तरुण संभाजीराजांचे शिवाजी महाराजांच्या दरबारातील अनुभवी मानकऱ्यांशी अनेकदा मतभेद होऊ लागले. संभाजी महाराजांचा अमात्य अण्णाजी दत्तोंच्या कारभाराला सक्त विरोध होता. शिवाजी महाराजांनी अण्णाजी हे अनुभवी आणि कुशल प्रशासक असल्यामुळे त्यांच्या भ्रष्ट कारभाराकडे अनेकदा दुर्लक्ष केले. पण संभाजी महाराजांना ते मान्य होणे कठीण होते. अण्णाजी दत्तो आणि इतर अनुभवी मानकरी संभाजी महाराजांच्या विरोधात गेले. दरबारातील काही मानकरी संभाजी महाराजांना अपमानास्पद वागणूक देऊ लागले; हे केवळ अण्णाजी दत्तोंच्या सांगण्यावरून केले. त्यांच्या विरोधामुळे त्यांना शिवाजी महाराजांबरोबर दक्षिण हिंदुस्थानच्या मोहिमेवर जाता आले नाही. तसेच शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत संभाजी महाराजांचे हुकूम पाळण्यास अष्टप्रधानमंडळाने नकार दिला. त्यामुळे शिवाजी महाराजांना कोकणातील शृंगारपूरचे सुभेदार म्हणून संभाजी महाराजांना पाठवावे लागले.

मुद्रा व दानपत्र

श्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते ।
यदं कसेविनी लेखा वर्तते कस्यनोपरि ।।

अर्थ: छत्रपती शिवरायांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांची ही राजमुद्रा जणू काही स्वर्गीय तेजाने तळपत आहे, आकाशाप्रमाणे अमर्याद आहे. या राजमुद्रेच्या आश्रयात प्रत्येक माणूस, प्रत्येक प्राणिमात्र महाराजांच्या छत्रछायेखाली असेल. छत्रपतींच्या या राजमुद्रेपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. संभाजी महाराजांना साधुसंतांबद्दल आदरभाव होता. ज्येष्ठ मांत्रिक कुडाळ ग्रामनिवासी नामदेवभट्टपुत्र बाकरेशास्त्री यांना करून दिलेल्या संस्कृतमधील दानपत्रावरून त्यांचा आदरभाव कळतो. छत्रपती संभाजी महाराजांना राजपद महत्प्रयासाने प्राप्त झाले होते. त्यांनी राजपद प्राप्तीसाठी नवस केला होता आणि त्यांना राज्याधिकार मिळाल्यानंतर तो नवस फेडण्याच्या इच्छेने त्यांनी नामदेवभट्टपुत्र बाकरेशास्त्री (ज्यांना संभाजी महाराज स्वामी म्हणतात) यांना दरसाल १०,००० पादशाही होनांचे संस्कृत दानपत्र करून दिले. हे दानपत्र संभाजी महाराजांच्या मंचाकारोहणानंतर एका महिन्याने म्हणजे दि. २४ ऑगस्ट १६८० (भाद्रपद शुद्ध १० सोमवार शके १६०२) रोजी केले आहे. दानपत्र ३०० से.मी. लांब आणि २३.५ से.मी. रुंद आहे. या दानपत्राच्या सर्वात वर मधोमध संभाजी महाराजांची १६ बुरुजी मुद्रा आहे व खाली सुवाच्य अक्षरात संस्कृतमध्ये २ ओळी लिहिल्या आहेत. त्या स्वतः शंभूराजांच्या हस्ताक्षरातील आहेत. संदर्भ हवा त्या ओळी खालीलप्रमाणे :

।। मतं मे श्री शिवराजपुत्रस्य श्रीशंभूराज ।।
।। छत्रपते: यद्त्रोपरिलेखितं ।। छं ।। श्री ।।

यात ते तत्कालीन दानपत्र लेखन पद्धतीप्रमाणे आपल्या पूर्वजांच्या व स्वतःच्या पराक्रमाचे व सद्गुणांचे वर्णन अतिशय सार्थ अशा शब्दांमध्ये करतात. आपले पणजोबा मालोजीराजे यांना शूरश्रेष्ठ व देवब्राम्हण प्रतिपालक असे संबोधतात तर आपले आजोबा महाराज शाहजीराजांस निशायुद्धप्रवीण, तसेच 'हैन्दवधर्मजीर्णोद्धाकरणघृतमति' म्हणजे स्वतःचा जीव धोक्यात घालून हिंदवी (हिंदू) धर्माचा जीर्णोद्धार करणारा असे संबोधतात. आपले वडील श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख 'म्लेंव्छक्षयदीक्षित' म्हणजे आपल्या तारुण्यातच ज्यांनी म्लेंछ क्षयाची दीक्षा घेतली व अनेक ताम्रांना पराभूत केले असा करतात. यावरून छत्रपती संभाजी महाराजांना आपल्या पराक्रमी पूर्वजांविषयी वाटणाऱ्या भावनेचे यथार्थ दर्शन होते. दि. ६ जानेवारी १६८१ रोजी छत्रपती संभाजी महाराजांनी गोपाळभट अग्रिहोत्री महाबळेश्वरकर यांच्या पुत्रास लिहिलेल्या पत्रात एक अतिशय समर्पक असे वाक्य आले आहे. ते वाक्य असे, ..राजश्री आबासाहेबांचे जे संकल्पित आहे ते चालवावे हे आम्हास अगत्य... संदर्भ हवा युवराज शंभू राजे छत्रपती झाल्यानंतर त्यांचे अलौकिक आणि अद्भुत अशा कार्याचा जर कुणी आढावा घेतला तर त्याला पदोपदी या वाक्याची प्रचीती येते. त्यांचे राजकीय धोरण, आर्थिक धोरण, प्रजाहितदक्षता या सर्व बाबींमध्ये त्यांनी आपल्या अद्वितीय अशा वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवलेला दिसतो. या प्रमाणेच त्यांच्या धार्मिक धोरणावरही छत्रपती शिवाजी महाराजांचाच ठसा कोरलेला आढळतो.

छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत मराठी राज्याचा अंमल गोमंतक परिसरात सुरू झाला. तेव्हापासून व्यापारी माणसांकडून घेण्यात येणारा अंगभाडे कर संभाजी महाराजांच्या आज्ञेने माफ करण्यात आला. या संबंधी फोंड्याजवळ अंत्रुज येथील हडकोळण या गावी एक शिलालेख आहे. या शिलालेखात संभाजी महाराजांनी मुख्याधिकारी मामले फोंडा धर्माजी नागनाथ यास करमाफीसंबंधी आज्ञा करताना मराठी अंमलाला उद्देशून खालील वाक्य कोरले आहे. संदर्भ हवा

औरंगजेबाने इ.स. १६८२ मध्ये मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेबाचे सैन्य मराठ्यांच्या सैन्याच्या पाचपटीने जास्त होते तर औरंगजेबाचे साम्राज्य संभाजी महाराजांच्या स्वराज्यापेक्षा कमीतकमी १५ पटींनी मोठे होते. त्याकाळी जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्यांमध्ये औरंगजेबाच्या सैन्याचा समावेश होत होता. तरीही संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी हिमतीने लढा दिला. संदर्भ हवा मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंझारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होय. औरंगजेबाच्या सरदारांची अशी अपेक्षा होती की तो किल्ला काही तासांतच शरणागती पत्करेल. पण मराठ्यांनी असा चिवट प्रतिकार केला की तो किल्ला जिंकण्यासाठी त्यांना तब्बल साडेसहा वर्षे लढावे लागले. संदर्भ हवा संभाजी महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना असा जोरदार धडा शिकवला की त्यांची संभाजी महाराजांविरुद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत झाली नाही. तसेच त्यांपैकी कोणीही त्यांच्याविरुद्ध उलटू शकला नाही. संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी सर्व शत्रूंशी एकहाती झुंज दिली. इ.स. १६८९च्या सुरुवातीला संभाजी महाराजांनी त्यांच्या महत्त्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणात संगमेश्वर येथे बोलावले. १ फेब्रुवारी, इ.स. १६८९ रोजी बैठक संपवून संभाजी महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने महाराजांच्या नजीकच्या मदतीने संगमेश्वरावर हल्ला केला, फ्रेंच गवर्नर गेनरल मार्टीनने त्याच्या डायरीत याची नोंद करून ठेवली आहे, की जवळच्या माणसांनी दगाफटका केला.३ कारवाईसाठी गुप्तता बाळगली आणि सर्व कारवाईची आखणी खूपच काळजीपूर्वक केली. मराठ्यांत आणि शत्रूच्या सैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. शत्रूने संभाजीमहाराजांना व त्यांच्यासोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले. छत्रपती संभाजी महाराज संगमेश्वरी पकडले गेल्यानंतर त्यांना वाचवण्याचे प्रयत्न झाले नाही असे नाही. महाराजांना वाचवण्यासाठी प्रयत्न मावळ्यांनी केले पण ते त्यात यशस्वी झाले नाही. यात सर्वात पहिला प्रयत्न हा जोत्याजी केसरकर यांनी केला. पुढे जाऊन अप्पा शास्त्री यांनी देखील महाराजांना सोडवण्याचा प्रयत्न केला पण हे दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले. मुघलांनी पकडल्या नंतर संभाजी महाराज आणि त्यांचे सल्लागार कवी कलश यांना औरंगजेबापुढे किल्ले बहादुरगड, आता धर्मवीरगड येथे आणण्यात आले. 'औरंगजेबाने संभाजी महाराजांना सर्व किल्ले त्याच्या स्वाधीन करून स्वतंत्र जिवन जगन्याचे' किंवा धर्मांतरण करून इस्लाम धर्म स्वीकार करून मुसलमान बनल्यास जीवनदान देण्याचे मान्य केले. पण संभाजी महाराजांनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. त्यानंतर औरंगजेबाने संभाजी महाराज आणि कवी कलश यांची विदूषकाचे कपडे घालून अत्यंत मानहानीकारक अशी धिंड काढण्यात आली. शेवटी दोघांनाही नर्क यातना देउन क्रूरपणे अत्यंत हालहाल करून ठार मारायचा आदेश दिला.

# अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई – अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे,अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे. अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५–२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून 'कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा' या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

# संत रोहिदास महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

मुंबई– संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी २०२६–२०२७ या वर्षात ५० टक्के अनुदान योजना' (९ लाभार्थी) आणि 'बीज भांडवल योजना' (११ लाभार्थी) राबविण्यात येत आहे. कर्ज या योजनेच्या लाभासाठी इच्छुक लाभार्थींनी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी सपर्क साधवा, असे आवाहन करण्यात येत आहे.

कर्ज प्रस्तावासोबत अर्जदाराने जोडावयाची कागदपत्रे :–

१) जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड.

२) शैक्षणिक दाखला, तीन फोटो कॉपीज, पॅन कार्ड, लाभार्थाचा उद्योग आधार प्रमाणपत्र,

३) ज्या ठिकाणी व्यावसाय करावयाचा असेल त्या जागेचा पुरावा (जागेचे लाईटबील, टॅक्स/भाडे पावती/भाडे करारनामा/ जागा वापर संमती पत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा इ.)

४) कागदपत्र खरी असल्याबाबत लाभार्थ्यांचा विनंती अर्ज व ज्या जागी व्यावसाय चालू आहे त्याच जागेचे प्रमाणित केलेले छायाचित्र.

५) ग्रामपंचायत, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र

६) व्यावसायासबंधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला

७) आवश्यकतेनुसार प्रकल्प अहवाल, सनदी लेखापालच्या सही व शिक्यासह

८) खरेदी करावयाच्या मालमत्तेच्या साहित्याचे जी.एस.टी. क्रमांक असलेले दरपत्रक (कोटेशन).

९) अर्जदाराचे वारसदाराच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र (रु.१००/– च्या स्टॅम्पपेपरवर)

१०) अर्जदाराचे तसेच जामिनदारांचे विहीत नमुन्यातील शपथपत्र (रु.१००/– च्या स्टॅम्पपेपरवर)

११) लाभार्थाचा आधारकार्ड क्रमांक तसेच आधार संलग्न बँक खाते क्रमाक

१२) दोन सक्षम जामिनदार (नोकरदार किंवा मालमत्ताधारक/ शेतकरी)

१३) सक्षम दोन जामिनदार अ २ शासकीय जामिनदारांच्या कार्यालयाचे हमीपत्र अथवा ब २ शेतकरी /मालमत्ताधारक यांचे सात बारा/नमुना क्र. आठच्या उता–यावर सक्षम अधिका–याची सही व शिक्यानुसारची उतारे सोबत सह. दुय्यम निबंधक अथवा गर्व्हमेंट व्हल्युवर यांचे सबंधित मालमत्तेचे मुल्यांकन पत्र अथवा प्रमाणपत्र आवश्यक. अर्जदार हा चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, होलार आदी) असावा. यापूर्वी त्याने महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. इच्छुक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाच्या तीन प्रती कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई शहर, गव्हर्नमेंट लेदर वर्किंग स्कूल कंपाऊंड, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०००५१ येथे स्वतः उपस्थित राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसह कर्ज प्रस्ताव दाखल करावेत. या योजनांचा लाभ घेऊन समाजबांधवांनी आपली सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

# मान्सूनपुर्व रोगप्रतिबंधक लसीकरणाला मोहिम स्वरुपात प्रारंभ १०० टक्के उद्दिष्टांच्यापुर्तीसाठी पशुसंवर्धन विभागाचे काटेकोर नियोजन–पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील

धुळे (जिमाका) – पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली. राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी पशुसंवर्धन विभागाने काटेकोर नियोजन केले आहे, या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. डॉ. पाटील यांनी सांगितले की, पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या घटसर्प व फऱ्या यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे.

मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गतजिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पशुपालकांना आवाहन – पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी आपल्या जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

भारत पशुधन प्रणाली'वर तात्काळ नोंदणी – मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लसीकरणाचे पारदर्शक डिजिटल ट्रॅकिंग होय. प्रत्येक पशुधनाला लस टोचल्यानंतर त्याची नोंद 'भारत पशुधन प्रणाली' या केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलवर रिअल–टाइम (तात्काळ) करणे आवश्यक आहे. पशुधनाचे टॅगिंग (१२ अंकी बिल्ला) करूनच ही नोंदणी केली जावी, जेणेकरून मोहिमेच्या प्रगतीवर थेट देखरेख ठेवता येईल व बोगस नोंदींना आळा बसेल.याबाबत सर्व पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत.

## राज्यातील सर्व आस्थापनांची पोश अधिनियमानुसार तपासणी करण्याचे महिला व बाल विकास आयुक्तांचे निर्देश

मुंबई– कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी पोश कायद्यानुसार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. राज्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्यांबरोबरच जिल्हाधिकारी कार्यालयातील प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांचेसह १२ संवर्गातील ४००० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांनी राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये अधिनियमाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले आहेत. आयुक्त डॉ.जगदीश मिनीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली. बैठकीला राज्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, मुख्यसेविका यांचेसह सर्व १२ संवर्गातील अधिकारी उपस्थित होते. राज्यातील १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी–कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांच्या तपासणी बरोबरच १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त यांनी दिले. ज्या कार्यालये अथवा आस्थापनांमध्ये योग्य अंमलबजावणी होत नाही, त्यांचेवर अधिनियमातील कलम २६ नुसार दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील सर्व विभागप्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये पॉश अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आवाहन केले आहे. केंद्र शासनाच्या शी बॉक्स पोर्टल वरील नोंदींनुसार महाराष्ट्र देशातील इतर राज्ये व केंद्र शासित प्रदेश यांच्या तुलनेत अग्रेसर आहे. राज्यातील १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी–कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये पॉश अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

## धुळे शासकीय तंत्रनिकेतनात ३ कोटींच्या ड्रोन लॅबचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

धुळे (जिमाका) – शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे येथे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत उभारण्यात आलेल्या सुमारे ३ कोटी रुपये खर्चाच्या अत्याधुनिक ड्रोन लॅबचे उद्घाटन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते काल करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे संस्थेचे प्राचार्य डॉ. राजू वाडेकर, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.रावल यांनी सांगितले की, ही ड्रोन लॅब महाराष्ट्रातील पदविका अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील पहिली अत्याधुनिक ड्रोन लॅब असून, संस्थेत शिक्षण घेणाऱ्या गुणवंत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी ती मोठी संधी ठरणार आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळून ते राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली गुणवत्ता सिद्ध करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याशिवाय भविष्यातही विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी अशाच प्रकारच्या आधुनिक प्रयोगशाळा उभारण्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

ड्रोन लॅबमुळे संस्थेतील विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञान, सर्वेक्षण, मॅपिंग, कृषी क्षेत्रातील अनुप्रयोग तसेच विविध औद्योगिक वापरांबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून, रोजगारक्षम कौशल्ये विकसित करण्यास मोठी मदत होणार आहे. प्राचार्य डॉ. राजू वाडेकर,यांनी ड्रोन लॅब उभारण्यामागील उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करून देण्यासाठी ही सुविधा महत्त्वाची ठरणार असल्याचे सांगितले.

# गोटपॉक्स लसीकरण: पहिल्या टप्प्यात ३७.५२ लाख लसमात्रांचे वाटप सुरु–पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील

धुळे (जिमाका) – राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पीचर्मरोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६–२७ या वर्षाकरिता आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांचे उत्पादन 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' येथे सुरू झाले आहे. २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील जिल्ह्यानिहाय गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन, पहिल्या टप्प्यात एकूण लस उत्पादनाच्या ४० टक्के म्हणजेच ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे वाटप नियोजनबद्ध रीतीने सुरू करण्यात आले आहे. पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. लम्पीप्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे'यासंस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादनय शस्वीपणे केले आहे. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी पुरवण्यात आलेली लस क्षेत्रीय स्तरावर वेळेत पोहोचवताना तिची शीत साखळी कुठेही खंडित होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी, गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षमता असलेल्या पशुंचे प्राधान्याने लसीकरण करण्यात यावे, लसीकरणाच्या विहित नमुन्यातील बिनचूक आणि एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत विभागनिहाय संस्थेकडे सादर करावा; अशा सूचना' पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' यासंस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याह्या खान पठाण यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना दिल्या आहेत.

हॉटस्पॉट तालुक्यांवर विशेष लक्ष – गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला होता, त्या भागात प्राधान्य क्रमाने लसीकरण मोहीम राबवावी.या व्यापक मोहिमेसाठी जिल्ह्यातील सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था तसेच खाजगी पशुवैद्यक व सेवादाते यांचे सक्रिय सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय यंत्रणेला करण्यात आले आहे.

पशुधनाच्या सुरक्षिततेला प्राधान्य – लंपी चर्मरोगासारख्या (ङ्खऊ) संसर्गजन्य आजारांपासून आपल्या राज्यातील गोधनाची सुरक्षा करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि आपल्या शेतकरी बांधवांचा मुख्य कणा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हाच एकमेव आणि सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. सद्यस्थितीत हा उपाय क्षेत्रीय स्तरावर आम्ही मोहिम स्वरुपात योजत आहोत. पशुपालकांनीही विभागास सहकार्य करावे.

# बायोचार युनिट व कापूस श्रेडरसाठी अनुदानासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरु

धुळे (जिमाका) – कापुस उत्पादकता अभियान (कपास कांती) योजना सन २०२६–२०२७ अंतर्गत पिक प्रात्याक्षिक, बायोचार युनिट व कापूस श्रेडरसाठी साठी 'महाडीबीटी'वर अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुरज जगताप यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. धुळे जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात केंद्र शासन पुरस्कृत 'कापूस उत्पादकता अभियान, कपास क्रांती' ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत कापूस पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध प्रात्यक्षिके व उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये सघन कापूस लागवड प्रात्यक्षिके ३ हजार ६० हेक्टर, क्लोज स्पेसिंग प्रात्यक्षिके दोन हजार ७७ हेक्टर, तसेच एकात्मिक पीक व्यवस्थापन प्रात्यक्षिके ३३२ हेक्टर क्षेत्रावर राबविण्यात येणार आहेत. याशिवाय स्थानिक पुढाकारांतर्गत ११ बायोचार युनिट्स आणि १२० कापूस श्रेडर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ही योजना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व विहित कार्यपद्धतीनुसार राबविण्यात येणार असून, खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी उपलब्ध असलेल्या अल्प कालावधीचा विचार करून लाभार्थी निवडीचे नियोजन करण्यात आले आहे. योजनेतील लाभाचे वितरणानुसार सर्वसाधारण प्रवर्गासाठी ७९ टक्के, अनुसूचित जातीसाठी १२ टक्के आणि अनुसूचित जमातीसाठी ९ टक्के असे निश्चित करण्यात आले आहे. तसेच सर्व प्रवर्गातील महिलांना किमान ३० टक्के लाभ देण्याची विशेष तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्राधान्याने लाभ देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या योजनेअंतर्गत पीक प्रात्यक्षिकांसाठी लाभार्थी निवड व अंमलबजावणीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांमार्फत प्रात्यक्षिके राबविण्यात येणार आहेत. यासाठी शेतकरी गटाची नोंदणी ३१ मार्च २०२६ पूर्वी झालेली असणे आवश्यक आहे. लाभार्थी गटांची निवड महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त अर्जाच्या आधारे प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. प्रत्येक गटामध्ये कमाल २५ शेतकरी आणि एका गावात एका पिकासाठी जास्तीत जास्त दोन गटांची निवड केली जाईल. योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व शेतकरी सभासदांकडे फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. निवड झालेल्या गटांना शासनाने निर्धारित केलेल्या नमुन्यानुसार हमीपत्र सादर करावे लागणार आहे.

महाडीबीटीवरील अर्जानुसार निवड झालेल्या लाभार्थ्यांची कृषी विज्ञान केंद्र किंवा कृषी विद्यापीठामार्फत मोफत प्रशिक्षणही दिले जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इच्छुक व पात्र शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले असून शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह महाडीबीटी पोर्टलवर वेळेत अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घेण्यात यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप यांनी केले आहे.

'हे' असतील नियम – अंमलबजावणीच्या निकषानुसार प्रात्यक्षिके १० हेक्टर क्षेत्राच्या समूहात आयोजित केली जातील. यामध्ये वैयक्तिक शेतकऱ्यासाठी किमान ०.४० हेक्टर आणि कमाल २ हेक्टर क्षेत्राची मर्यादा असेल. ज्या भागात कापूस उत्पादकता कमी आहे अशा भागांना आणि लघु व अल्पभूधारक तसेच महिला शेतकऱ्यांना प्राधान्य तसेच महिलांसाठी किमान ३० टक्के लक्षांक राखीव ठेवण्यात आला आहे. दिव्यांग, तृतीयपंथी आणि वनहक्क पट्टाधारक शेतकऱ्यांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रात्यक्षिकासाठी निवडलेल्या क्षेत्राची मृदा आरोग्य चाचणी करणे आवश्यक राहील. क्षेत्र मोजण्यासाठी कृषी ॲपचा वापर केला जाईल. बियाण्याच्या बाबतीत शिफारस केलेल्या वाणांना प्राधान्य द्यावे.रासायनिक खतांचा खर्च शेतकऱ्यांनाच करावा लागणार असून, त्यावर कोणतीही अनुदान दिले जाणार नाही. प्रत्येक प्रात्यक्षिक क्षेत्रावर योजनेची माहिती दर्शविणारा माहिती फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.

बायोचार युनिट व कापूस श्रेडरसाठी अनुदान – या योजनेअंतर्गत बायोचार युनिट आणि कापूस श्रेडरसाठी अनुदान देण्यात येणार आहे. बायोचार युनिटसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्था पात्र असून, प्रति युनिट कमाल १० हजार रुपये किंवा खर्चाच्या ५० टक्के अनुदान देण्यात येईल. कापूस श्रेडरसाठीही याच घटकांतील लाभार्थी पात्र राहतील. अनुसूचित जाती–जमाती प्रवर्गासाठी ५० टक्के किंवा कमाल ७५ हजार रुपये, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४० टक्के किंवा कमाल ६० हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

# १ ऑगस्टपासून महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला असून आज अखेर राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डेही लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. दरम्यान, स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले आहे.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी १ ऑगस्टपूर्वी आपले स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते कार्यान्वित करून घ्यावे, असे आवाहन परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – महात्मा फुले मागासवर्ग विकास आर्थिक विकास महामंडळामार्फत सन २०२६–२७ या आर्थिक वर्षात विविध कर्ज व अनुदान योजना राबविण्यात येत असून, या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, धुळेचे जिल्हा व्यवस्थापक के. जी. जोपळे यांनी केले आहे. अनुसुचित जाती व नवबौध्द लोकांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने १० जुलै १९७८ रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना केलेली असुन हे महामंडळ महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत कार्यरत आहे.

महामंडळाअंतर्गत बँकेच्या माध्यमातून ५० टक्के अनुदान योजना व बीज भांडवल योजना तसेच थेट कर्ज योजना ह्या तीन योजना राबविल्या जातात. सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता धुळे जिल्ह्यासाठी ५० टक्के अनुदान योजनेंतर्गत १० लाभार्थी व बीज भांडवल योजनेंतर्गत १० लाभार्थी तसेच थेट कर्ज योजनेंतर्गत २० लाभार्थींचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. या योजनेची माहिती महामंडळाच्या संकेतस्थळावर ही उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (म.) जिल्हा कार्यालय ए विंग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, साक्री रोड, सिंचन भवनाच्या पाठीमागे, धुळे येथे संपर्क साधावा. असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री.जोपळे यांनी केले आहे.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)